# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत खामला येथिल शास्त्री ले –आऊट
**{प्रकल्प विभाग}** उद्यानात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व शौचालय बांधकाम करण्याबाबत आदेश प्राप्त आहे. उद्यान परिसरात मोठया प्रमाणात जेष्ठ नागरीक सकाळ – सायंकाळ फिरायला येत असतात, त्यांना विश्रांती म्हणून विरंगुळा केंद्र व शौचालयाचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

मौक्यावर जागा उपलब्ध असुन रु. 91,84,446/- राशीचे प्राकलणास व कामाचे प्रकल्प सल्लागार म्हणून मे. उमेश पाटील यांची निम्नत्तम दराची म्हणजेच 1.85% प्रमाणे EOI ला मा. आयुक्त यांनी दि. 26/07/2024 रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता नविन विरंगुळा केंद्र व शौचालय बांधकाम करण्याकरीता रु. 91,84,446/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व कामाचे प्रकल्प सल्लागार मे. उमेश पाटील यांची न्युम्नतम दराची म्हणजेच 1.85% प्रमाणे कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेस सादर.

टिप :

1. प्रस्तुत कामाकरीता सन 2024-25 चे अंदाजपत्रकामधील पदशिर्ष क्रं. A46802273624 अंतर्गत उद्यान विभागाकडुन तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
2. सदर कामाचे प्राकलणास व प्रकल्प सल्लागाराचे नियुक्ती करीता मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
3. सदर कामाकरीता अधिक्षक अभियंता यांची रु. 65,82,483/- दि. 18.7.2024 रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
4. निस्तृत टिपणी नस्तीत संल्गन आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 941/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 31/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत खामला येथिल शास्त्री ले –आऊट उद्यानात जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व शौचालय बांधकाम करण्याबाबत आदेश प्राप्त आहे. उद्यान परिसरात मोठया प्रमाणात जेष्ठ नागरीक सकाळ – सायंकाळ फिरायला येत असतात, त्यांना विश्रांती म्हणून विरंगुळा केंद्र व शौचालयाचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

मौक्यावर जागा उपलब्ध असुन रु. 91,84,446/- राशीचे प्राकलणास व कामाचे प्रकल्प सल्लागार म्हणून मे. उमेश पाटील यांची निम्नत्तम दराची म्हणजेच 1.85% प्रमाणे EOI ला मा. आयुक्त यांनी दि. 26/07/2024 रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता नविन विरंगुळा केंद्र व शौचालय बांधकाम करण्याकरीता रु. 91,84,446/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व कामाचे प्रकल्प सल्लागार मे. उमेश पाटील यांची न्युम्नतम दराची म्हणजेच 1.85% प्रमाणे कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.